**SET – 4**

**Series : TYM/C**

कोड नं.
**Code No. 8**

रोल नं.
**Roll No.** | | | | | | | |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **10** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.
- Please check that this question paper contains **8** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **10** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* | *गुण : 80*

*निर्धारित समय : 3 घंटे* | *अधिकतम अंक : 80*

*Time allowed : 3 hours* | *Maximum Marks : 80*

## Section – A

1. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

जसजसा माणूस सभ्य होतो, समाजाच्या दृष्टीने सुसंस्कृत होतो, तसतशी त्याला अश्रूंची अडचण वाटते; तो मग हात जोडतो, मिळेल तिथे, भेटेल त्याला हात जोडतो, जोडूया, आपण हात जोडूया. जगात जे जे सुंदर, जे जे शोभिवंत, जे जे नितळ-स्वच्छ-निर्मळ त्याला आपण हात जोडूया. परंतु अश्रूंची भाषाही आपण शिकूया. दोन हातांच्या नमस्कारापेक्षा डोळयांतले दोन अश्रू मला हळू आवाजात सांगतात, "माणसातले माणूसपण अजून गेलेलं नाही. ते बघ ते जिवँत आहे."

फुलांच्या भाषेन बोलायचं झालं तर भारतीय संस्कृतीचे दोन पदर नजरेस पडतात. एक पारिजाताचा आणि दुसरा झेंडूचा.

पारिजात हे सोवळं, स्पृश्य-अस्पृश्य मानणाऱ्या जुनाट संस्कृतीचं प्रतीक. नाजूक देठाचं आणि उमले पर्यंत फांदीपासून विलग होणारं फूल. एकाच्या परसातलं जीवनसत्त्व शोषून दुसऱ्याच्या अंगणाला सुशोभित करणारं पांढरंशुभ्र पण आतल्या गाठीचं फूल.

झेंडूचं तसं नाही. झेंडूचा देठ मजबूत आणि देठाची नाळ मातीच्या गाभ्यापर्यंत पोहोचलेली. झेंडू अतिशय पारदर्शी आणि प्रामाणिक फूल. ज्याच्या परसात फुलतं त्याच्याच परसाची शोभा वाढवणं हा त्याचा धर्म. झेंडू आत एक बाहेर एक असं वागत नाही. दाखव – लपव करत नाही.

(1) 'सुसंस्कृत' शब्दाचा अर्थ खालील पर्यायांपैकी कोणता आहे ? **1**

(a) संस्कृत भाषेत प्रावीण्य असलेला

(b) चांगले संस्कार झालेला

(c) चांगली कृत्ये करणारा

(2) डोळयांतले दोन अश्रू कोणता संदेश देतात ? **3**

(3) झेंडूच्या फुलाचे व्यक्तिमत्त्व कसे असते ? **3**

2. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

पृथ्वीवरील सर्वात अधिक कार्यक्षम शिकारी प्राणी बनण्या साठी आवश्यक अशा शारीरिक शस्त्रांची योजना वाघाच्या शरीरात नियतीने केलेली आहे. तीन–चार इंच लांबीच्या अणकुचीदार वाघनखांचे चार–चार पंजे, दोन–तीन इंच लांबीच्या चार अजस्र सुळयांनी सुसज्ज असलेला भक्कम जबडा, अफाट शक्ति सामर्थ्य, अमर्याद सोशिकता......याहून आणखी ते काय हवे ? पण याचा अर्थ नियतीने वाघाला सर्वच काही अगदी डोळे झाकून दिले आहे, असा नाही. नियतीचे वाटप तसे कधीच नसते. तसे असते तर वाघाने जंगलात, आणि कदाचित पृथ्वीवरही, औषधापुरताही अन्य प्राणी शिल्लक ठेवला नसता. यासाठी वाघाच्या अश्वमेधाचा वारू रोखणाऱ्या गतिरोधकांचीही निर्मिती वाघाच्या शरीरातच योजना करून ठेवली आहे. यापैकी विशेष उल्लेखनीय अडसर म्हणजे वाघाचा तळपाय नियतीने तुलनेने खूप नाजूक ठेवला आहे. त्यामुळे वाघाला खडबडीत, खडकाळ आणि काटेरी जमिनीवर चालणे कष्टाचे जाते व पळणे तर अशक्य प्रायच भासते. साहजिक च मोठा पल्लेदार पाठलाग त्याला झेपत नाही. एकदा का त्याचे सावज खडकाळ मार्गावर पोचले, की सुटले असेच समजावे. वाघाचा सगळा जोर फक्त पहिल्या एक–दोन झेपे पुरता असतो. त्यानंतर पाठ लागात त्याचे अवसान गळते.

(1) पुढीलपैकी कोणता शब्द मुळात नाम असून येथे त्याचा विशेषणासारखा उपयोग केलेला आहे ? **1**

(a) अधिक

(b) शिकारी

(c) शारीरिक

(2) नियतीने वाघाच्या शरीररचनेत एक उणीव ठेवली नसती तर काय झाले असते ? **3**

(3) वाघाच्या नाजूक तळपायां मुळे काय होते ? **2**

## Section – B

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा **किंवा** मुद्दयांच्या आधारे गोष्ट पूर्ण करा. **8**

(1) घर स्वच्छ, तसे गावही स्वच्छ

(2) वीजनिर्मिती बंद झाली तर......

(3) हसा आणि निरोगी रहा

**किंवा**

खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा व योग्य शीर्षक द्या.

मुद्दे : उन्हाळयाची सुटी–मामाच्या गावाला जाणे – आजोबाआजी ची भेट – मामेभावंडां बरोबर खेळणे – संध्याकाळी शेतात फिरायला जाणे – मामीने जेवणात केलेले पदार्थ – आनंदात सुटी संपणे

4. खालीलपैकी **एका** विषयावर पत्र लिहा. **5**

(1) आसिफ / रेशमा शेख, सदर बाजार, दिल्ली येथून आपल्या परिसरात नेहमी होणाऱ्या वाहतूक-कोंडीबाबत वाहतूक पोलिस अधीक्षक, दिल्ली यांना पत्र लिहितो / लिहिते.

(2) प्रकाश / प्राजक्ता देशपांडे, स्नेहसंमेलन प्रमुख, शारदा विद्यालय, दादर, मुंबई, येथून शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी अल्योपहाराचे कंत्राट देण्यासंबंधात सन्मान उपाहारगृह, चर्चगेट, मुंबई, यांना पत्र लिहितो / लिहिते.

## Section – C

5. (a) खालील प्रश्न सूचनेप्रमाणे सोडवा : (कोणतेही **पाच**) **5**

1. गंगा ही पवित्र नदी आहे अशी लोकांची श्रद्धा आहे. (विशेषनाम ओळखा.)
2. <u>आजकाल</u> सगळीकडेच तपमान वाढले आहे. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)
3. मांजर खुर्चीखाली बसले होते. (शब्दयोगी अव्यय ओळखा.)
4. तू लौकर ये <u>म्हणजे</u> आपल्याला खूप बोलता येईल. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)
5. पावसामुळे ती येऊ शकली नाही. (सर्वनाम ओळखा)
6. अरेच्चा ! पुन्हा पाऊस आला ! (केवलप्रयोगी अव्यय ओळखा.)

(b) पुढील वाक्ये कंसांतील सूचनेनुसार बदला. (कोणतीही **तीन**) **3**

1. काल आई आणि ताई शेतात भांगलणी करत होत्या. (कर्मणी प्रयोग करा.)
2. ध्वनिवर्धकाचा आवाज फार कर्कश आहे. (उद्गारार्थी करा.)
3. विद्यार्थी गुरुजनांना नमन करतात. (भावे प्रयोग करा.)
4. एवढी साधी गोष्ट का मला सांगायला हवी ? (विधानार्थी करा.)

(c) सूचनेनुसार वाक्य लिहा. (कोणतेही **दोन**) **2**

1. नवरात्रीत हमखास मुसळधार पाऊस पडतो. (भविष्यकाळ करा.)
2. काल आम्ही नाटक पहायला गेलो होतो. (काळ ओळखा.)
3. अजूनही बरेच लोक अंधश्रद्धा पाळतात. (भूतकाळ करा.)

(d) लिंग बदला : **2**

1. मित्र
2. मोलकरीण
3. पुजारी
4. प्राध्यापक

(e) वचन बदला : **2**

1. मार्ग
2. पान
3. पुस्तके
4. घरटे

(f) समानार्थी शब्द लिहा : **2**

1. आकांक्षा
2. बदल
3. अनुभव
4. राजा

(g) विरुद्धार्थी शब्द लिहा : **2**

1. जल्लोष
2. जबाबदार

## Section – D

6. (a) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. **4**

(1) भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखे च प्रिय असते की !

(2) "अरे कोच्चू ! अरे स्वर्गीची गंगा आज तुझ्या दारी अवतर ली आहे."

(3) 'आपण कुणाचे तरी नाते वाईक ही ओळख अर्थपूर्ण, की आपण स्वत: च अमुक अमुक हे अर्थपूर्ण आणि महत्त्वाचं ?'

(b) योग्य पर्याय निवडून वाक्य परत लिहा. **1**

पन्हाळ्याचा उरूस आम्हा सर्वांच्या साठी ________.

(1) खूप कष्टाचा होता

(2) खूप महाग होता

(3) खूप आनंदाचा होता

7. (a) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **50** ते **60** शब्दांत लिहा : **8**

(1) रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावाच्या पोशाखाचे वर्णन करा.

(2) महात्मा गांधी यांची श्रमप्रतिष्ठेची शिकवण प्रत्यक्षात आणण्यासाठी लेखकाने शालेय वयात कोणकोणती कामे केली ?

(3) निसर्गाला नित्यनव्याचा सोस असतो असे का म्हटले आहे ?

(4) बाबा आमटे यांची संवेदनाशील वृत्ती स्पष्ट करा.

(b) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : **2**

(1) केशवच्या बहिणीचे नाव काय आहे ?

(2) हिमाल याची शुभ्रधवल हिमशिखरं लेखकाला कोठे दिसू लागली ?

(3) चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा कोणता काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला ?

(4) राजा रविवर्मा यांच्या आयुष्यातला सर्वात मोठा आनंदाचा क्षण कोणता ?

8. (a) खालीलपैकी कोणत्याही **एका** पद्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : **4**

(1) "तुझे नामामृत सार । नरहरी जपे निरंतर ।।"

(2) "बाभळीच्या बनाशेजारी आंब्याची आमराई
गर्द सावली पहुडलेली वारा गातो अंगाई"

(3) "आपण सावित्रीच्या ज्योती
आपण रमाईच्या वाती
समतेचं अंगण, झिजणारं चंदन
करू रक्ताचं पाणी गं"

(b) कंसातील योग्य पर्याय निवडून ओळ पूर्ण करा. **1**

सुखशांतीचे धडवू_______. (देऊळ, मंदिर, घरकुल)

9. (a) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **50** ते **60** शब्दांत लिहा : **8**

(1) संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?

(2) माझ्या घरटयात या कवितेत कवीला कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?

(3) स्वेदगंगा, पाथरवट, विश्वकर्मा या शब्दांचे अर्थ स्पष्ट करा.

(4) 'प्रलय' या कवितेत कवीने माणसाकडून कोणती अपेक्षा केली आहे ?

(b) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : **2**

(1) संत सोयराबाई यांच्या मते, लोक कशात गुंतले आहेत ?

(2) आपल्या हृदयातून कोणता समान झोत वाहतो असे कवयित्रीला वाटते ?

(3) संत सेना महाराज यांचा सर्व थकवा कशामुळे गेला ?

10. (a) खालील पठित उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : **4**

गावा-गावांत शेतकऱ्यांच्यात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. जर कोठे शेतकऱ्यांच्यात गट-तट असतील तर त्याची कारणे शोधून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. जर कोणी चुकीच्या पद्धतीने जाण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यांना समजावून सांगून, प्रसंगी संघटित शेतकऱ्यांचा दबाव आणून योग्य भूमिका घेण्यास भाग पाडले जात असे. एकूण गावा-गावांत शांतता कशी नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जाई.

राष्ट्र प्रेमाने प्रेरित झालेल्या तरुणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. प्रसंगी जवळपासच्या चार गावांतील स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीने विधायक कार्य करणाऱ्यांना एकत्र आणून राष्ट्रीय आंदोलनाची वाढ कशी होईल याचा विचार करून वेगवेगळ्या तालुक्यांत अनेक गावांतून सभा व परिषदा घेतल्या जायच्या. तेथे शाहिरी व कवने म्हणणाऱ्या मुलांना प्रोत्साहन दिले जायचे.

प्र. संघटित होण्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

**किंवा**

प्र. संघटित करण्यासाठी काय काय केले जाई ते स्पष्ट करा.

(b) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतीही **दोन**) **2**

(1) आनंद यादव यांनी कोल्हापूर, पंढरपूर आणि ________ या गावांच्या व्यक्तिमत्त्वांचे वर्णन केले आहे.

(रत्नागिरी / औरंगाबाद / मुंबई)

(2) _______ नद्यांच्या सुपीक भागात दरोडेखोरांचा उपद्रव होता.

(गंगा-यमुना / कृष्णा-वारणा / कावेरी – तुंगभद्रा)

(3) जुईची आई ________ कामाला जायची.

(वाचनालयात / बँकेत / शाळेत)

(4) आपल्या मनात कधीही कुणाविरुद्ध _______ असता कामा नये.

(प्रेम / कौतुक / द्वेष)

____________